मा.न्या.(सेवानिवृत्त) श्री.दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करण्याकरीता समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-१११७/प्र.क्र.२४२/कार्या-११
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दि. ९ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :-

सर्व जिल्हा न्यायालये व दुय्यम न्यायालयातील कायम स्वरुपी पदांचा व कामाचा आढावा घेऊन आवश्यक त्या पदांचा स्टाफींग पॅटर्न निश्चित करण्यासाठी दि. २९.९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा. न्यायमूर्ती (सेवानिवृत्त) श्री.एन.व्ही.दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट गठीत करण्यात आला आहे.

अभ्यासगटाने बृहन्मुंबई वगळून उर्वरित जिल्हा न्यायालये व त्यांच्या अधिनस्त न्यायालयांसाठी एकूण ५ खंडामध्ये सविस्तर अहवाल उच्च न्यायालयाच्या इन्फ्रास्ट्रक्चर कमिटीकडे सादर केला आहे. मा. मुख्य न्यायमूर्ती यांनी अभ्यास गटाच्या अहवालास मंजूरी दिली आहे.सदर अहवाल अंमलबजावणीसाठी प्रबंधक (निरीक्षणे-१) उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनाकडे पाठविला आहे.

अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही होण्यासाठी, सदर अहवालातील शिफारशींचा सखोल अभ्यास करुन शासनाला मार्गदर्शक सुचना करण्याकरीता समिती गठीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर समिती गठीत करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.

शासन निर्णय :-

मा.न्या. (सेवानिवृत्त) श्री.दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करण्याकरीता अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (वित्त विभाग)	अध्यक्ष
२) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव (सामान्य प्रशासन विभाग)	सदस्य
३) प्रधान सचिव व विधी परामर्शी	सदस्य
४) सहसचिव-नि-विधी सल्लागार	सदस्य सचिव

२. उपरोक्त समितीने मा.न्या.(सेवानिवृत्त) श्री.दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करुन शासनास मार्गदर्शक सुचना कराव्यात.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१४१३२६०२२३१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Nijamoddin
Jahiroddin Jamadar

Digitally signed by Nijamoddin Jahiroddin Jamadar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1a04c87922c611cd86db0417549c441857561c576c21b21f3c8d180884505e, serialNumber=2d8330a5714ce128e5b1288da65913bb6442fcd5a9326fcf969b743129edbe50, cn=Nijamoddin Jahiroddin Jamadar
Date: 2018.02.14 13:32:15 +05'30'

(एन. जे.जमादार)
प्रधान सचिव व विधि परामर्शी

प्रती,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मा.राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव,
३. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. श्री.अ.श्या.कलोती, विधि सल्लागार नि सहसचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, मुंबई.
९. विधि व न्याय विभाग कार्या-०४,०६,०९,१२.,
१०. निवडनस्ती.